# उपकारस्तुतीचा दिवस २०२६

प्रिय बंधू आणि भगिनींनो,

रविवार, ४ ऑक्टोबर रोजी आपल्या चर्चचा उपकारस्तुतीचा दिवस साजरा करण्यासाठी आपण तयारी करत असताना, या संपूर्ण वर्षभर आपल्याला मार्गदर्शन आणि प्रेरणा देत आलेल्या या उत्साहवर्धक वचनाला धरून आपण हा सण साजरा करूया: **“भिऊ नकोस, विश्वास मात्र धर”** (मार्क ५: ३६).

भीती आणि विश्वास यांच्या सीमेवर उभा असलेल्या याईरने ते शब्द ऐकले. ज्या गोष्टीची त्याला सर्वात जास्त भीती वाटत होती, तीच जणू सत्यात उतरली होती, तरीही येशूने त्याला त्याच्यावर विश्वास ठेवण्यास सांगितले. त्याच्या समोरची परिस्थिती अशी होती की भीती वाटणे अगदी स्वाभाविक होते; येशूने त्याला विश्वासात स्थिर राहण्याचे आवाहन केले.

कदाचित उपकारस्तुतीची सुरुवात सुद्धा येथूनच होते: विश्वासाने.

जेव्हा आपण आपल्या जीवनातील आशीर्वाद स्पष्टपणे पाहू शकतो, तेव्हा उपकारस्तुती व्यक्त करणे सोपे असते. परंतु कृतज्ञता ही केवळ आपल्या आयुष्यात चांगल्या घडलेल्या गोष्टींची मोजदाद करण्यापेक्षा अधिक गहन आहे. तिची सुरुवात या अनुभवाने होते की, आपली परिस्थिती काहीही असो, देव आपल्या जवळ आला आहे. येशू ख्रिस्तामध्ये, त्याने आपल्याला ते दिले आहे जे आपण स्वतः कधीही कमवू किंवा मिळवू शकलो नसतो. आपल्या कोणत्याही बलिदानाने जे कधीही साध्य झाले नसते, ते ख्रिस्ताने वधस्तंभावर आधीच पूर्ण केले आहे. आपण देवाला काहीही अर्पण करण्यापूर्वीच तो आपल्यावर प्रीती करतो.

यामुळे देण्याबद्दलचा आपला विचार बदलतो.

देवाची कृपा मिळवण्याच्या उद्देशाने आपण देत नाही आणि आपला विश्वास सिद्ध करण्यासाठीही देत नाही. देव आपल्याकडून कोणत्याही परताव्याची अपेक्षा करत नाही. उलट, त्याने आपल्यावर केलेल्या कृपेचा आणि आपल्याला दिलेल्या सर्व गोष्टींचा आपण जेव्हा विचार करतो, तेव्हा आपल्या अंतःकरणातील उपकारस्तुती स्वतःला व्यक्त करण्यासाठी आपोआप एक मार्ग शोधते.

याच भावनेत अर्पणाचे खरे मर्म दडलेले आहे. कॅटेकिझम अर्पणाकडे देवाची उपासना करण्याचा, त्याचे आभार मानण्याचा आणि स्वतःला त्याच्याकडे समर्पित करण्याचा एक मार्ग म्हणून पाहते (पहा सीएनएसी १३.२). देवाने आपल्या हाती सोपवलेल्या गोष्टींची जाणीव ठेवून, कृतज्ञतेने आपण त्याला आपल्यातील काहीतरी अर्पण करतो. आपले आर्थिक अर्पण हे या त्यागाचे एक स्वरूप आहे.

बायबलने फार पूर्वीपासून देण्याचा संबंध देवावरील विश्वासाशी जोडला आहे. प्रथमफळे देवाला अर्पण केली गेली, कारण देवाला त्यांची गरज होती म्हणून नव्हे, तर त्याच्या लोकांनी ओळखले होते की त्यांचे आशीर्वाद कोठून आले आहेत (पहा निर्गम २३: १९). येशूनेही देण्याविषयी सांगितले, आणि नेहमी रकमेच्या पलीकडे जाऊन देणाऱ्याच्या अंतःकरणाकडे लक्ष वेधले.

हे आपण त्या विधवेमध्ये पाहतो जिने दोन नाणी आणली (लूक २१: १-४). तिचे अर्पण सहजपणे दुर्लक्षित झाले असते. पण येशूने तिला पाहिले. त्याने केवळ हेच पाहिले नाही की तिने काय दिले, तर ते कोणत्या अंतःकरणाने दिले हे देखील त्याने पाहिले.

आपले अर्पण हा देवाप्रती आपली कृतज्ञता व्यक्त करण्याचा एक मार्ग आहे. कॅटेकिझम आपल्याला आठवण करून देते की, एक विश्वासू व्यक्ती “अधिक व्यापक अर्थाने, म्हणजेच आपले स्वतःचे हृदय समर्पित करून” देखील अर्पण देऊ शकते (पहा सीएनएसी १३.२.३). अशा प्रकारे, आपली कृतज्ञता आपण स्वतःला कसे अर्पण करतो यालाही आकार देऊ शकते म्हणजेच आपला वेळ, आपली क्षमता, आपले लक्ष, आपली काळजी यांद्वारे. जसे

# उपकारस्तुतीचा दिवस २०२६

की कदाचित एखाद्या संघर्ष करणाऱ्या व्यक्तीला दिलेला धीर, एकटेपणात असलेल्या व्यक्तीसोबत वाटून घेतले भोजन, कुटुंबात दाखवलेला संयम, मनापासून क्षमा करणे कठीण असतानाही केलेली क्षमा, किंवा एखाद्या व्यक्तीला आपली गरज असताना त्याच्या सोबत उपस्थित राहण्याची साधी तयारी, यातून ही कृतज्ञता व्यक्त होऊ शकते.

यापैकी कोणतीही गोष्ट असामान्य वाटणार नाही. दोन नाणीही तशीच वाटली होती.

उपकारस्तुती देवाने आपल्या जीवनात जे काही दिले आहे, त्याला आपण कृतज्ञतेने कसा प्रतिसाद द्यावा, याचा विचार करण्यासाठी आपल्यापैकी प्रत्येकाला आमंत्रित करते. कृतज्ञतेपोटी मी देवाला काय अर्पण करू शकतो? माझ्या जीवन पद्धतीत, माझ्या देण्यात आणि इतरांची सेवा करण्यात माझी कृतज्ञता कशी दिसून येऊ शकते?

जेव्हा आपली मुले आपल्याला अशाप्रकारे जगताना पाहतात, तेव्हा ते काहीतरी सुंदर शिकू शकतात. ते शिकतात की कृतज्ञता ही केवळ बोलण्यापुरती मर्यादित नाही, आणि देवावरील विश्वास हा केवळ जाहीरपणे व्यक्त करण्यापुरता मर्यादित नाही. त्यांना दिसते की देवाने आपल्याला दिलेली देणगी केवळ आपल्यासाठीच नाही. आणि विश्वास आपल्या जीवनाला कशी दिशा देतो हेही ते पाहतात जसे की, आपण आपल्या वेळेचा कसा वापर करतो, लोकांशी कसे वागतो, इतरांची सेवा कशी करतो, आपल्याजवळचे इतरांसोबत कसे वाटून घेतो आणि आपले संपूर्ण जीवन कसे जगतो.

शेवटी, हे आपल्या चर्चच्या कार्याचाच एक भाग आहे: एक उबदार सहभागिता जोपासणे, जिथे प्रत्येकजण देवाची प्रीती आणि त्याची व इतरांची सेवा करण्याचा आनंद अनुभवू शकेल.

म्हणून, ४ ऑक्टोबरचा दिवस जवळ येत असताना, देवाने आपल्याला दिलेल्या सर्व आशीर्वादांची कृतज्ञतेने जाणीव ठेवू. त्याच्यावर पूर्ण विश्वास ठेवून, आपापल्यापरीने आपण आपल्या हृदयातील कृतज्ञता आपल्या अर्पणातून, इतरांसोबत प्रीतीने वाटून घेण्यातून आणि स्वतःला इतरांच्या सेवेसाठी समर्पित करण्यातून व्यक्त होऊ देऊ.

आपल्या विभागातील प्रेषित आणि बिशपांसोबत मिळून, आम्ही तुम्हाला आणि तुमच्या प्रियजनांना आशीर्वादित आणि कृतज्ञतेने भरलेल्या उपकारस्तुतीच्या दिवसाच्या शुभेच्छा देतो.

आपला नम्र,



आर्नोल्ड मार्टिंग